# समिती दर्पण

फेब्रुवारी २०२५

विद्यार्थी साहाय्यक समिती : दूरध्वनी : ०२०-२५५३३६३१, मोबाईल : ९४०४८५५५३०
ईमेल : info@samiti.org, वेबसाईट : www.samiti.org

## समितीविषयी...

ग्रामीण भागातील हजारो विद्यार्थ्यांच्या जीवनात परिवर्तन घडविणारी संस्था आणि युवा परिवर्तनाचे केंद्र म्हणून विद्यार्थी साहाय्यक समितीच्या कामाकडे पहावे लागेल. गुणवत्ता आहे, परंतु पैशांअभावी शहरात येऊन उच्च शिक्षण घेता येत नाही, अशा विद्यार्थ्यांसाठी पुण्यात अतिशय माफक दरात राहण्याची आणि जेवणाची सोय उपलब्ध करून द्यावी, या हेतूने डॉ. अच्युतराव आपटे, स्वातंत्र्य सेनानी हरिभाऊ फाटक, सुमित्राताई केरकर आदींनी सन १९५५ मध्ये समितीची स्थापना केली. पाच विद्यार्थ्यांची वेगवेगळ्या घरी वाराने जेवणाची सोय करण्यापासून कामाला सुरुवात झाली. आज समितीची पुण्यात सात आणि नगरमध्ये एक अशी आठ वसतिगृहे आहेत. त्यात सुमारे ११०० विद्यार्थी -विद्यार्थिनींची निवास-भोजनाची व्यवस्था तर आहेच, शिवाय त्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी उपक्रम राबविले जात आहेत. स्वच्छता, समता आणि श्रमप्रतिष्ठा या त्रिसूत्रीवर समितीचे काम चालते.

# कार्यकर्त्यांच्या कामाचा कुटुंबीयांच्या हस्ते सन्मान

समितीच्या कार्यक्रमांमध्ये, विविध उपक्रमांमध्ये कार्यकर्ते, कर्मचारी नेहमीच सहभागी होतात. त्यांच्या कुटुंबीयांचा यात प्रत्यक्ष सहभाग नसला, तरी पाठिंबा मात्र असतो. या कुटुंबीयांना कार्यकर्ते व कर्मचाऱ्यांच्या कामाची माहिती व्हावी, यासाठी समितीत नुकताच एक आगळावेगळा कार्यक्रम आयोजित केला होता. यात कुटुंबीयांच्या हस्तेच कार्यकर्ते व कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

गेल्या काही वर्षांत समितीचा झपाट्याने विस्तार होत आहे. मुलींनी उच्च शिक्षण घ्यावे, अशी अलीकडे ग्रामीण भागातील पालकांची मानसिकता वाढत आहे. पुण्यासारख्या शहरात परवडणारा खर्च आणि सुरक्षितता यामुळे विद्यार्थ्यांचे समितीकडे येण्याचे प्रमाण वाढते आहे. प्रथमच अहिल्यानगर येथेही संस्थेची दोन वसतिगृहे उभी राहत आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी नवनवे प्रकल्प समिती हाती घेत आहे. समितीच्या कार्याची ओळख सातासमुद्रापारही झाली आहे. तेथूनही अनेक मदतीचे हात पुढे येत आहेत. या साऱ्यांमध्ये समितीच्या कार्यकर्त्यांचे व कर्मचाऱ्यांचे योगदान मोठे आहे. अनेक कार्यकर्ते वर्षानुवर्षे समितीसाठी काम करत आहेत, आपला वेळ देत आहेत, तेही कोणत्याही मानधनाची अपेक्षा न ठेवता. कर्मचारीही समितीसाठी झोकून देऊन काम करतात. असे काम करत असताना कुटुंबाचे पाठबळ आवश्यक असते. त्यामुळे कुटुंबीयांना कार्यकर्त्यांच्या आणि कर्मचाऱ्यांच्या कामाची माहिती व्हावी, आपला पती किंवा पत्नी समितीत नेमके कोणत्या स्वरुपाचे काम करत आहे, हे समजावे यासाठी हा विशेष कार्यक्रम आयोजित केला होता. यात तरुण कार्यकर्त्यांबरोबरच वयोमानामुळे आता काम करू न शकणारे ज्येष्ठ कार्यकर्तेही पूर्वीच्याच उत्साहाने सहभागी झाले होते.



### ज्येष्ठ कार्यकर्त्यांकडून आठवणींना उजाळा

प्रत्येक कार्यकर्त्याने व कर्मचाऱ्याने समितीसाठी काय योगदान दिले आहे किंवा देत आहे, याची सविस्तर माहिती यावेळी देण्यात आली. ज्येष्ठ कार्यकर्त्यांनी आठवणींना उजाळा देत समितीविषयीच्या भावना व्यक्त केल्या. सध्या समितीच्या कामात माजी विद्यार्थ्यांचा सहभाग मोठा आहे. त्यातून अनेक कामे उभी राहात आहेत, त्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

“ मी संस्थेचा माजी विद्यार्थी. अच्युतरावांचा खूप स्नेह लाभला. शासकीय नोकरीतून निवृत्त झाल्यावर समितीच्या कामात सहभागी झालो. अनेक चांगल्या गोष्टी करता आल्या. आता माजी विद्यार्थ्यांचा सहभाग वाढला आहे. चांगल्या पद्धतीने संस्थेचे काम विस्तारत आहे. माझ्यासारख्या सर्व जुन्या कार्यकर्त्यांना आवर्जून बोलावल्याबद्दल समाधान वाटले. संस्थेची प्रगती बघून आनंद वाटतो.

**- नामदेव खमितकर**

### समिती :
### एक विशाल कुटुंब

मोत्यांची माळ जशी झळाळते,
तशीच ही कर्मयोग्यांची शक्ती फुलते।
समर्पण, सेवा, निष्ठा अपार,
समितीचा वटवृक्ष उभा भक्कम आधार।।

डॉ. अच्युतरावांची दूरदृष्टी महान,
मूल्यांचा पाया, संस्कारांचा सन्मान।
विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना दिला आधार,
भविष्यास दिली नवी दिशा भव्य अपार।।

PGP सरांचे मार्गदर्शन अनमोल,
प्रत्येक पावलावर प्रकाशमय बोल।
संघटन कौशल्य, ध्येयाचा ध्यास,
त्यांच्या सहवासात मिळतो नवा विश्वास।।

संस्कारांचा दीप येथे रोज उजळतो,
विद्यार्थ्यांच्या भविष्याचा मार्ग मोकळा होतो।
संघटन, समर्पण अन् कर्तृत्वाचा प्रकाश,
मोठ्या कुटुंबाचा हा सुंदर प्रवास।।

आजचा सोहळा प्रेरणेचा संगम,
भावनांचा ओलावा, सेवेस उमटला ध्यास।
आम्ही भाग्यवान, लाभली संधी अमूल्य,
समितीच्या सेवेत वाहतो आम्ही जीवन उदात्त।

कार्यक्रमानंतर **डॉ. ज्योती गोगटे** यांनी उत्स्फूर्तपणे व्यक्त केलेली प्रतिक्रिया

# साहित्यिकांपर्यंत पोहोचविली समितीची माहिती

९८ वे
अखिल भारतीय
मराठी साहित्य संमेलन, दिल्ली
२०२५

मराठी साहित्य, भाषा आणि संस्कृतीच्या अभिजात परंपरेला उजाळा देणाऱ्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन या महत्त्वपूर्ण सोहळ्यासाठी विद्यार्थी साहाय्यक समितीचे प्रतिनिधी म्हणून दिल्ली येथे जाण्याची संधी मिळाली.

महाराष्ट्रातील साहित्य रसिकांसाठी १९ फेब्रुवारीला सोडण्यात आलेल्या विशेष रेल्वेने (महादजी शिंदे एक्स्प्रेस) दिल्लीला रवाना झालो. या प्रवासादरम्यान मराठी साहित्ययात्री संमेलन झाले. हा पहिलाच प्रयोग चाकांवरचे साहित्य संमेलन म्हणून ओळखला गेला. साहित्ययात्री संमेलनाचे संमेलनाध्यक्ष शरद तांदळे व स्वागताध्यक्ष उद्योग व मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांची यावेळी भेट झाली. त्यांना समितीची माहिती सांगितली.

संमेलनाची सुरुवात माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी, शरद पवार, देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाली. या कार्यक्रमात सुप्रिया सुळे, नीलम गोऱ्हे, राजीव खांडेकर, उदय सामंत, स्मिता वाघ, पृथ्वीराज चव्हाण यांसारख्या अनेक मान्यवरांचा सहभाग होता. विद्यार्थी साहाय्यक समितीचे प्रतिनिधी म्हणून आम्ही या मान्यवरांपर्यंत समितीची माहिती पोहोचवली व त्यांना समितीच्या कार्यपद्धतीची ओळख करून दिली. त्याचबरोबर समितीला भेट देण्याची विनंतीही केली.

या संमेलनाच्या निमित्ताने मराठी भाषेच्या विविध पैलूंची ओळख झाली. भाषिक अभिमान, साहित्यिक विचार आणि मराठी संस्कृती जतन करण्याच्या दृष्टीने होणाऱ्या उपक्रमांची माहिती मिळाली. अनेक दिग्गज साहित्यिक, कवी, लेखक, पत्रकार आणि अभ्यासक यांच्याशी संवाद साधण्याची संधी मिळाली. या सर्वांपर्यंत समितीची माहिती पोहोचवली.

“ या अनुभवातून नेतृत्वगुण, संघटन कौशल्य, आणि मराठी भाषेविषयीची नवीन दृष्टी मिळाली. हा संपूर्ण प्रवास अविस्मरणीय आणि प्रेरणादायी ठरला.

**- सुशील पुरी, प्रशांत कदम**



### ...आणि आजींनी दिली देणगी!

आम्ही जेथे राहिलो होतो, तेथून संमेलन स्थळापर्यंत जाण्यासाठी बसची व्यवस्था करण्यात आली होती. आमच्या हॉटेलमध्ये एक आजी राहायला होत्या. त्यांना बसमध्ये चढताना आणि उतरताना अडचण येत होती. मी दोन दिवस त्यांना बसमध्ये चढताना, उतरताना आधार दिला आणि त्यांचे सामान व्यवस्थित ठेवायला मदत केली. दिल्लीवरून निघायच्या दिवशी, आजींनी मला जवळ बोलावले आणि म्हणाल्या, "तुझ्या मदतीमुळे मला प्रवास सोपा गेला." त्यांनी माझ्या हातात दोनशे रुपयांची नोट दिली, परंतु मी नकार दिला. त्यांच्याशी गप्पा मारताना मी त्यांना सांगितले, की मी विद्यार्थी साहाय्यक समितीचा विद्यार्थी आहे. हे ऐकून आजींनी आपल्या बॅगेतून पाचशे रुपयांची नोट काढली आणि ती माझ्या खिशात ठेवली. त्या आर्थिक मदत नव्हती, तर त्यांच्या प्रेमाची आणि आशीर्वादाची निशाणी होती. त्यांच्या त्या एका कृतीमुळे मला माणुसकीचे आणि सेवाभावाचे खरे मूल्य उमगले.

**- प्रशांत कदम**




# मुलींच्या नवीन वसतिगृहात शांती सदन

## शेंदुरे दांपत्याच्या हस्ते पाचव्या मजल्याचे उद्घाटन

विद्यार्थी साहायक समितीच्या मुलींच्या नवीन वसतिगृहातील पाचव्या मजल्याचे उद्घाटन सौ. रजनी आणि अशोक शेंदुरे यांच्या हस्ते झाले. या मजल्यासाठी शेंदुरे दांपत्याने अर्थसाह्य केले आहे. या मजल्याला ‘शांती सदन’ असे नाव देण्यात आले आहे.

यावेळी समितीचे अध्यक्ष प्रतापराव पवार यांनी शेंदुरे दांपत्याचे आभार मानले. ते म्हणाले, ‘मी दहा वर्षे सीओईपीमध्ये कार्यरत होतो. त्यावेळी केवळ १६ टक्के मुली उच्च शिक्षण घेत होत्या. वसतिगृहाची सुविधा मिळाल्यानंतर हा आकडा ४२ टक्क्यांपर्यंत वाढला. यावरून वसतिगृहाचे महत्त्व स्पष्ट होते. विद्यार्थी साहायक समितीने आजवर केलेले कार्य उल्लेखनीय आहे आणि भविष्यातही मुलींच्या सर्वांगीण विकासासाठी समिती तत्पर राहील.’

यावेळी कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर उपस्थित होते.

“ अनेक वर्षांपासून विद्यार्थी साहायक समितीच्या कार्याविषयी ऐकत आहे. ग्रामीण भागातील गरजू विद्यार्थ्यांना पुण्यासारख्या ठिकाणी निवास, भोजन आणि सर्वांगीण विकासाची संधी मिळावी, यासाठी समिती प्रयत्नशील आहे. आम्ही पुणे सोडून ५५ वर्षे झाली असली तरी आमची नाळ अजूनही या शहराशी जोडलेली आहे. समितीच्या कार्याला मदत करता आल्याचा आनंद आहे.

**- रजनी शेंदुरे**

# घेता घेता एक दिवस देणाऱ्याचे हात घ्यावे

तयाचा वेलू...

सात- आठ प्रयत्नांनंतर समितीमध्ये प्रवेश मिळविलेल्या विद्यार्थ्यापासून समितीच्या कायम विश्वस्तपदापर्यंतचा स्वप्न, जिद्द आणि कष्टांचा तुकाराम गायकवाड यांचा प्रवास!





तुकाराम गायकवाड यांचे बारावीपर्यंतचे शिक्षण शिक्रापूर व जवळच्या छोट्या खेड्यात बुरुंजवाडी येथे झाले. तेव्हाचे आयुष्य, शेतीमध्ये कामे करण्यात, गायींच्या धारा काढण्यात आणि दूध व गवत विकण्यात चालले होते. पण मुळातली हुशारी आणि कष्ट करण्याची वृत्ती, यामुळे त्यांना त्यांच्या चुलत बहिणीने पुण्याची वाट दाखवली. त्यांच्या वडिलांची त्यासाठी अजिबात तयारी नव्हती. खूप मिनतवाऱ्या केल्यावर घरातून परवानगी मिळाली, पण समितीमध्ये प्रवेश मिळेना. कारण बारावीचे मार्क आणि त्यानुसार निवडलेली कॉमर्स शाखा आणि कॉलेज.

तांबोळीसरांनी त्यांना खूप अटी घालून प्रवेश दिला. ज्यात 'कमवा- शिका' सक्तीचे केले. हॉस्टेलमध्ये विविध कामे करून, जबाबदाऱ्या घेऊनही पदवी परीक्षेनंतर एक दिवसही समितीत राहण्याची परवानगी दिली नाही. तांबोळी सरांनी त्यावेळी जे जे केले त्याचा शेवट, मी आता जसा आहे तो घडण्यात झाला, असे गायकवाड सांगतात.

समितीच्या 'कमवा- शिका' आणि पाल्य- पालक या योजनांतून त्यांना आयुष्याचे धडेच मिळाले. 'कमवा- शिका'मुळे घरी पैसे मागण्याची वेळ आली नाही. त्यातून कामाची जबाबदारी घेण्याची, ते उत्तम पार पडण्याची सवय लागली. एखाद्या गोष्टीत सुधारणा करण्याच्या दृष्टीने आपणहून आपण काय करू शकतो, हा विचार मनात कायम ठेवून त्याप्रमाणे काम करण्याला समितीमधून, तांबोळीसरांकडून कायम प्रोत्साहन मिळाले. पुढे गायकवाड सरांनी जे काही काम केले, त्यात त्यांचा हाच गुण प्रकर्षाने जाणवतो. समितीचा गणेशोत्सव, योग प्रशिक्षक, मॅरॅथॉन व्यवस्थापन अशा विविध गोष्टींतून त्यांच्यातल्या मॅनेजरला पैलू पडत राहिले.

समितीने काय दिले, यात सरांनी आवर्जून उल्लेख केला तो मैत्रीचा. कुठल्याही अडचणीत, कुठल्याही वेळी हाक मारता येतील असे, कधी कधी नातेवाईकांपेक्षा सुद्धा जास्त जवळचे झालेले मित्र. ही मैत्री आज पस्तीस- चाळीस वर्ष झाली तरी तशीच आहे.

समितीत असताना श्रीमती रत्ना दाढे त्यांच्या पालक होत्या. त्यांनी लावलेल्या अनेक उत्तम सवयीतली एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांनी करायला लावलेला दासबोधाचा अभ्यास. हा दासबोध त्यांना अजूनही दिशा दाखवत आहे. रत्नाताईंनी त्यांना त्यांच्या वडिलांकडे काम मिळवून दिले. ते कर सल्लागार होते. मनापासून काम केल्यामुळे सरांना टॅक्सेशनची सगळी माहिती मिळाली. त्या अभ्यासू वृत्तीच्या बळावर त्यांना ती प्रॅक्टिससुद्धा पदवी परीक्षेनंतर मोफत मिळणार होती. पण तेव्हा घरी नियमित उत्पन्न येण्याची जास्त गरज होती म्हणून त्यांनी नोकरीचा पर्याय निवडला. पण मनाशी हीच खूणगाठ बांधून की एक दिवस आपल्याला व्यवसाय सुरू करायचा आहे.

कॉर्पोरेट क्षेत्रातील नामवंत कंपन्यांमधून गायकवाड सरांनी जबाबदारीची विविध पदे भूषवली. काम करताना येणाऱ्या अडचणींवर चाकोरीबाहेर जाऊन मार्ग काढणे, ही त्यांची खासियत त्यांच्या प्रत्येक यशात जाणवते. पण सरांचे आयुष्याचेही प्लॅनिंग होते आणि हे कॉर्पोरेट यश, त्यांना त्यापासून रोखणार नव्हते. पंचेचाळीसाव्या वर्षी स्वतःचा व्यवसाय, हा त्याच प्लॅनिंगमधला एक टप्पा. त्यासाठी त्यांनी नोकरी सांभाळून एमबीए केले. त्यांच्या सहधर्मचारिणीचा त्यांना पूर्ण पाठिंबा होता. काहीतरी शेतीसंबंधी उद्योग करावा, असे आधी त्यांच्या मनात होते. पण केलेल्या अभ्यासाचा, अनुभवाचा फायदा हा की, त्यांनी त्यांचे अधिक कौशल्य असलेले इम्पोर्ट- एक्सपोर्ट हेच क्षेत्र निवडले.

गायकवाड एंटरप्राइजेस प्रायव्हेट लिमिटेड ही २०१५ मधे स्थापना झालेली, एका क्लायंटपासून सुरुवात झालेली त्यांची कंपनी आता शंभरच्या वर कर्मचारी आणि चाळीस- पन्नास कॉर्पोरेट क्लायंटपर्यंत पोचली आहे.

१९८७ ते ९० या दरम्यान समितीमध्ये विद्यार्थी म्हणून राहिल्यानंतर १९९३ पासून सर परत समितीमध्ये यायला लागले. योगवर्ग घेणे, क्वीझ घेणे अशी सुरुवात झाली. मग विद्यार्थी विकास केंद्राची जबाबदारी घेतली. १९९७ मध्ये कार्यकर्ता म्हणून काम करू लागले. समिती जास्तीत जास्त गरजू मुलांपर्यंत पोचली पाहिजे, समितीचा उत्कर्ष झाला पाहिजे, यासाठी वेगळ्या वाटेने विचार होण्याची गरज होती. कुठल्याही सामाजिक कार्याचा विस्तार आणि कार्यपद्धती टिकवायची असेल तर ते काम व्यावसायिक दृष्टीनेच केले पाहिजे, हा सरांचा विचार! समितीचे कार्यकारी विश्वस्त झाल्यावर गायकवाड सरांनी दोन आघाड्या उघडल्या, एक सीएसआरमधून निधी जमवणे आणि खर्च आटोक्यात आणण्यासाठी, विद्यार्थ्यांच्या हिताला बाधा येऊ न देता, उपाययोजना करणे. सरांनी थिंक टँक ची संकल्पना आणली. त्यात विश्वस्त, कार्यकर्ते, माजी विद्यार्थी, सल्लागार अशा योग्य लोकांची योजना केली. बदलाचे स्वागत करू शकतील, असे अनुभवी आणि झोकून देऊन काम करण्याची वृत्ती असलेले तरुण ह्या सर्वांनी समितीचा कायापालट घडवून आणला. ह्या सर्व उपाययोजनांमुळे समितीचा विस्तार आता १३०० विद्यार्थ्यांपर्यंत, नऊ अद्ययावत हॉस्टेलपर्यंत झाला आहे.

समितीच्या भल्याची तळमळ, त्या बरोबरीने धाडसी आणि दूरदृष्टी यामुळे समितीमधल्या या विद्यार्थ्याचा प्रवास, समितीच्या कायम विश्वस्तपदापर्यंत येऊन पोचला आहे. ही संस्था कायमस्वरूपी राहिली पाहिजे, हा तिच्या संस्थापकांचा उद्देश असणारच त्यासाठी ती योग्य व्यक्तींच्या हातात राहिली पाहिजे, हे तांबोळीसरांचे स्वप्न त्यांच्याच विद्यार्थ्याने प्रत्यक्षात उतरवले आहे. हा त्यांचा प्रवास म्हणजे "घेता घेता एक दिवस देणाऱ्याचे हात घ्यावे" याचे एक उदाहरणच आहे..!

**(शब्दांकन- माधवी कुलकर्णी)**

समिती वृत्त



## कोल्हापूर, कोकण सहलीत ऐतिहासिक, सांस्कृतिक दर्शन

समितीच्या व्यवस्थापनातील विद्यार्थ्यांची १० व ११ फेब्रुवारी रोजी कोल्हापूर आणि कोकणात शैक्षणिक व सांस्कृतिक सहल आयोजित करण्यात आली होती. या सहलीत डॉ. आपटे वसतिगृहाच्या पर्यवेक्षिका सौ. सविता भुक्ते आणि लजपत संकुलचे पर्यवेक्षक कुंदन पठारे विद्यार्थ्यांसमवेत सहभागी झाले होते. या सहलीत कोल्हापुरात रंकाळा तलाव पाहिला. कणेरी मठाला भेट दिली. तेथे भारतीय ग्रामीण जीवनशैली दर्शवणारे अनोखे संग्रहालय पाहिले. महालक्ष्मी मंदिरात जाऊन दर्शन घेतले. पन्हाळा किल्ला पाहिला. रात्रीचा मुक्काम 'वास्तल्य' या स्वयंसेवी संस्थेत केला. दुसऱ्या दिवशी कशेळी बीच पाहून गणपतीपुळे येथे गणपतीचे दर्शन घेतले. ही दोन दिवसीय सहल विद्यार्थ्यांसाठी ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि निसर्गरम्य अनुभवाने समृद्ध ठरली. विद्यार्थ्यांनी सहलीचा भरभरून आनंद घेतला.

## 'कलासंगम'मध्ये शिल्पकलेचे प्रशिक्षण

मुलींच्या नवीन वसतिगृहात ९ फेब्रुवारीला कलासंगम ही शिल्पकलाविषयक कार्यशाळा आयोजित करण्यात होती. प्रसिद्ध चित्रकार, शिल्पकार आणि समितीच्या कार्यकर्त्या प्रज्ञा सातारकर यांनी या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी दृश्यात्मक आणि स्लाईड शोच्या मदतीने विविध कलाकृती दाखवल्या, ज्यामध्ये त्यांची चित्रे, शिल्पे, जीर्णोद्धार कार्य, भिंतीवरील मुरल्स, दगडी कला यांचा समावेश होता. प्रज्ञा यांनी लाकूड शिल्पकार अंकुश कानगुडे आणि वर्ल्ड रेकॉर्ड अवॉर्ड जिंकणाऱ्या पहिल्या भारतीय महिला शिल्पकार सुप्रिया शिंदे यांची मुलाखत घेतली. चित्रकार वर्षा चौगुले आणि श्रीमती माडखोलकर यांनी फुले रंगवून थेट प्रात्यक्षिक दाखवले. रश्मी पोफहुले, व्यवसायाने रांगोळी कलाकार आहेत, परंतु त्यांनी वयाच्या ७५ व्या वर्षी गायनाला सुरुवात केली, त्यांनी गणपती स्तवन गायले. शिल्पकार विजय सरोदे समितीची विद्यार्थिनी स्नेहा भोर हिचे शिल्प तयार करून लाईव्ह डेमो दिला. यावेळी सहभागी विद्यार्थ्यांना माती देऊन कलाकृती तयार करण्यासाठी प्रोत्साहित करण्यात आले.

## योग प्रशिक्षण कार्यशाळेत ६५ मुलामुलींचा सहभाग



सोहम अॅकॅडमी, हैदराबाद व विद्यार्थी साहाय्यक समितीच्या वतीने १ व २ फेब्रुवारी रोजी मुलींच्या नवीन वसतिगृहाच्या योगासन कक्षात योग प्रशिक्षण कार्यशाळा झाली. यात लजपत संकुल, मुलींचे नवीन वसतिगृह व सुमित्रा सदन या वसतिगृहांतील ६५ विद्यार्थी-विद्यार्थिनी सहभागी झाले. कार्यशाळेत सोहम अॅकॅडमीचे योग प्रशिक्षक भरत राम यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी योगाविषयक माहिती प्रात्यक्षिकांद्वारे समजावून सांगितली. दैनंदिन जीवनात ध्यानाचे महत्त्व पटवून दिले, योगासनांची प्रात्यक्षिके दाखविली. पारंपरिक योगपद्धती व त्याचप्रमाणे योगमुद्रा दाखवल्या. त्यानंतर लेखी व प्रात्यक्षिक स्वरुपात योगपरीक्षा घेण्यात आली. कार्यशाळेच्या समारोपप्रसंगी समितीचे आरोग्य अधिकारी डॉ. अभय व्यवहारे यांच्या उपस्थितीत विद्यार्थी -विद्यार्थिनींना प्रशस्तीपत्रे देण्यात आली.

कार्यशाळेचे नियोजन लजपतराय भवन वसतिगृहाचा योग प्रमुख भारत काकडे, योग शिक्षक सुशील पुरी, सुमित्रा सदनची योग प्रमुख गायत्री शेळके यांनी केले. वसतिगृह समन्वयक कुंदन पठारे, नम्रता गजरे यांनी सहकार्य केले.



*देणगीदार साधना व सुनील शेणॉय यांनी दिलेल्या देणगीतून उभारलेला योगासन कक्ष व एका खोलीचे उद्घाटन २१ फेब्रुवारी रोजी साधना शेणॉय यांच्या हस्ते झाले. दरम्यान, देणगीदार चंद्रशेखर व अनिता पेंढारकर यांच्या हस्ते २४ फेब्रुवारी रोजी दोन खोल्यांचे उद्घाटन झाले. तर माजी विद्यार्थी बाळासाहेब शेलार व पत्नी दीपा यांनी दिलेल्या देणगीतून उभारलेल्या खोलीचे उद्घाटन त्यांच्या विवाहाच्या २५ व्या वाढदिवसानिमित्त २७ फेब्रुवारीला करण्यात आले.*



# स्पर्धांद्वारे विविध कौशल्यांचा विकास

## विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद, परीक्षकांकडून सादरीकरणाचे कौतुक

विद्यार्थ्यांमधील वक्तृत्व, सृजनशीलता आणि सादरीकरण कौशल्ये विकसित करण्याच्या दृष्टीने विद्यार्थी विकास केंद्राच्या वतीने वार्षिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांना विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद मिळाला. परीक्षकांनी विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाचे कौतुक केले.

**विविध स्पर्धांमधील प्रथम तीन विजेते पुढीलप्रमाणे-**

सुमित्राताई केरकर कथाकथन स्पर्धा- साक्षी नेटके (डॉ. आपटे वसतिगृह), प्राजक्ता जामोदे (सुमित्रा सदन), साक्षी सुर्वे (सुमित्रा सदन).
परीक्षक - संग्राम रेडके, दीपक पिंपळे, ज्ञानेश्वर जाधवर

- **डॉ. अच्युतराव आपटे वादविवाद स्पर्धा-**


**सकारात्मक बाजू-** श्रद्धा माधव, कल्याणी पोटे, पर्णवी म्हस्के
**नकारात्मक बाजू-** माहेश्वरी गिरडे, मधुरा जोशी, समीक्षा राठोड.
परीक्षक- मोहित सावंत, सौगंध देशमुख

- **Extempore Competition-** वैष्णवी शेळके (डॉ. आपटे वसतिगृह), आर्या देशमुख (नवीन मुलींचे वसतिगृह), क्रांती निकम (मुलींचे नवीन वसतिगृह).
परीक्षक- गुणरत्न सोनटक्के, एअर कमांडर एस. आर. घारपुरे
- **काव्यवाचन स्पर्धा-** मधुरा जोशी (नवीन मुलींचे वसतिगृह), साक्षी थोरात (सुमित्रा सदन), प्रमिला केळे (डॉ. आपटे वसतिगृह). परीक्षक- आदित्य माळी, राधिका पवार
- **आचार्य स. ज. भागवत वक्तृत्व स्पर्धा-** श्रद्धा माधव (सुमित्रा सदन), माहेश्वरी गिरडे (डॉ. आपटे वसतिगृह), समृद्धी शिर्के (नवीन मुलींचे वसतिगृह).
परीक्षक- राहुल जाधव, रचना परदेशी
- **पी. डी. कारखानीस इंग्लिश PPT प्रेझेंटेशन-** पर्णवी म्हस्के (नवीन वसतिगृह), प्रतिक माणकर (लजपत संकुल), सानिका येळमाट (नवीन वसतिगृह).
परीक्षक- डॉ. अमोल निकाले, दशरथ गावीत
- **मॉडेल प्रेझेंटेशन स्पर्धा-** यज्ञेश चौधरी आणि अरविंद काळे (लजपत संकुल), चैतन्य अनारसे (लजपत संकुल), समृद्धी कोल्हे (डॉ. आपटे वसतिगृह).

## मैत्री पुस्तकांशी

- सेजल डेरे

### आयुष्य घडविणाऱ्या छोट्या गोष्टी




कला काम करण्याची या पुस्तकात लेखक अनिल शिदोरे यांनी सुमारे शंभर मुद्द्यांवर लेख लिहिले आहेत. त्यातील प्रत्येक मुद्दा आपल्या दैनंदिन जीवनात महत्त्वाचा आहे. अनेक छोट्या छोट्या गोष्टी असतात, ज्याकडे आपले फारसे लक्ष नसते. मात्र त्या गोष्टींचा आपल्या जीवनावर, मनावर, आपल्या रोजच्या वागण्यावर परिणाम होत असतो. त्या सर्व गोष्टी लेखकाने पुस्तकात नमूद केल्या आहेत. कार्याचे स्वरुप, विश्रांतीचा उपदेश, न करण्याची कला, प्रयत्न आणि काम, सतत सावधपणा, साथीदार डायरी अशा गोष्टींवर लेखकाने सविस्तर विवेचन केले आहे. लेखकाच्या मते, एका दृष्टिक्षेपात आपल्याला आपले नियोजन कळेल, अशी रचना, रोजच्या घडामोडींची सुयोग्य मांडणी आणि महत्त्वाच्या नोंदी या तीन गोष्टी डायरीमध्ये असायला हव्यात, ज्या आयुष्यात आपल्याला मदत करतील.

**पुस्तकाचे नाव : कला काम करण्याची लेखक : अनिल शिदोरे**



# स्ट्रेस मॅनेजमेंटबाबत मार्गदर्शन

विद्यार्थी साहाय्यक समिती व रोटरी क्लब प्राइड पुणे यांच्या वतीने ९ फेब्रुवारी रोजी डॉ. आपटे वसतिगृहात मेंटल हेल्थ अँड स्ट्रेस मॅनेजमेंट या विषयावर सत्र झाले.

यावेळी मुलींना मेंटल हेल्थ अँड स्ट्रेस मॅनेजमेंट या विषयावरील चित्रफित दाखवण्यात आली. यामध्ये एकूण ६ मोड्युल होते. प्रत्येक मोड्युल संपल्यानंतर रोटरी क्लबच्या पदाधिकाऱ्यांनी त्याबद्दलची अधिक माहिती दिली व प्रत्येक संकल्पना सविस्तरपणे समजावून सांगितली. विद्यार्थिनींकडून विविध ॲक्टिव्हिटी करून घेतल्या.

यावेळी रोटरी क्लबच्या प्रेसिडेंट राधा गोखले, तसेच वैशाली देव, श्वेता जोशी, बिंदू कुलकर्णी, कविता मुळे, अनिता कासोदेकर, संपदा कुंटे, शमा केरूळकर या पदाधिकारी, विद्यार्थी साहाय्यक समितीचे कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर, विद्यार्थी विकास केंद्राचे अध्यक्ष प्रभाकर पाटील, कार्यवाह सीमा होस्कोटे, कार्यकर्त्या सुप्रिया केळवकर, आपटे वसतिगृहाच्या पर्यवेक्षिका सविता भुक्ते व विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चैत्राली जेधे हिने केले. अनुष्का राउत हिने आभार मानले.

# डॉ. स्मिता दातार यांचा विद्यार्थ्यांशी संवाद



'लेखक आपल्या भेटीला' या उपक्रमांतर्गत २७ फेब्रुवारी रोजी आयोजित कार्यक्रमात लेखिका डॉ. स्मिता निखिल दातार यांनी विद्यार्थी- विद्यार्थिनींशी संवाद साधला. मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून मुलींच्या नवीन वसतिगृहात झालेल्या या कार्यक्रमाला कार्यकर्ते, कर्मचाऱ्यांसह विद्यार्थी- विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी डॉ. दातार यांच्या अयोध्येची उर्मिला, फक्त 'ती'च्यासाठी, प्रभु अजी गमला, द व्हायोलीन सिंग्ज, कॅनव्हास, चौकोनाचा पाचवा कोन या पुस्तकांवर कार्यकर्त्या वासंती नाटेकर, कविता हेबाळकर, पूजा चौधरी, सुशील पुरी, शुभम पाटील, वैष्णवी शेळके, श्रुती रसाळ. भूमिका निरपळ, साक्षी सुर्वे यांनी अभिप्रायांचे वाचन केले. त्यानंतर आपल्या लेखनप्रवासाविषयी डॉ. दातार यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पूजा चौधरी हिने केले.



*अमेरिकेत विद्यार्थी सहाय्यक समिती फाउंडेशनचे काम पाहणाऱ्या अंजलीताई अंतुरकर यांनी समिती स्टॉलला भेट दिली.*

# राष्ट्रीय एकात्मतेचे विद्यार्थ्यांना धडे

विद्यार्थी सहाय्यक समिती, विद्यार्थी विकास केंद्र आणि ज्ञानप्रबोधिनीचा ज्ञान सेतू प्रकल्प यांच्या वतीने १६ फेब्रुवारी रोजी विद्यार्थ्यांसाठी एक महत्त्वपूर्ण कार्यशाळा झाली. राष्ट्रीय एकात्मता वाढवणे, शिक्षणाचे महत्त्व पटवून देणे, विविध संस्कृतींचा आदर करणे आणि विद्यार्थी विकास साधणे, हा या कार्यशाळेचा उद्देश होता. कार्यशाळेत आशुतोष भुजबळ, तन्मय भोसले, अभिषेक इंगळे, शाल्मली साळवी आणि आविष्कार भिंताडे यांनी मार्गदर्शन केले. पर्यवेक्षक नम्रता गजरे, मोनिका शिंदे आणि सचिन खांडेकर उपस्थित होते.



**ही कार्यशाळा हिंदी भाषेत झाली. "क, ख, ग" असे कार्यशाळेचे सूत्र होते.**
**क-** कहानी (कथा) **ख-** खेल (खेळ) **ग-** गाना (गाणी)

या अंतर्गत विज्ञान प्रयोग, शिक्षणात्मक खेळ, कथा आणि गाण्यांद्वारे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. एकूण ३५ विद्यार्थ्यांनी कार्यशाळेत सहभाग घेतला.

# विश्व मराठी संमेलनातील स्टॉलला ३०० जणांची भेट

फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर ३१ जानेवारी ते २ फेब्रुवारी दरम्यान झालेल्या विश्व मराठी संमेलनात सहभाग घेण्याची संधी विद्यार्थी साहाय्यक समितीला मिळाली. या संमेलनानिमित्त भरविलेल्या प्रदर्शनात समितीचा स्टॉल होता.

महाराष्ट्र शासनाचा मराठी भाषा विकास व राज्य मराठी विकास संस्था यांच्या वतीने हे संमेलन आयोजित करण्यात आले होते. प्रदर्शनातील समितीच्या स्टॉलला सुमारे ३०० जणांनी भेट दिली. कार्यकर्ते, कर्मचारी, विद्यार्थ्यांनी यासाठी सहकार्य केले.

# माजी विद्यार्थी मेळाव्यात ५५० विद्यार्थ्यांचा सहभाग

समितीच्या माजी विद्यार्थ्यांचा ३६ वा स्नेहमेळावा २३ फेब्रुवारी रोजी झाला. राज्याच्या विविध भागातून सुमारे ५५० विद्यार्थी या मेळाव्यात सहभागी झाले.

मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ माजी विद्यार्थी ज्ञानेश्वर गटकळ होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी विद्यार्थी महेंद्र बिडवई, पुष्पा आरोटे उपस्थित होते. यावेळी समितीचे अध्यक्ष प्रतापराव पवार, कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर, माजी विद्यार्थी मंडळाचे अध्यक्ष गणेश काळे, सचिव मनीषा गोसावी आदी उपस्थित होते, यंदाच्या मेळाव्याचे प्रायोजकत्व जुन्नर तालुक्यातील माजी विद्यार्थ्यांकडे होते. समन्वयक निसार चौगुले होते. सुनील चोरे यांनी सूत्रसंचालन केले. मंडळाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी मेळावा यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

